# इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन -एक अभ्यास

**भाग्यश्री शाम राठोड**

सहयोगी प्राध्यापक,

संगमेश्वर पब्लिक स्कूल, सोलापूर

**सारांश :-**

*इयत्ता ९ वीच्या मराठी विषयाच्या शिक्षकांच्या अध्यापनातून सर्जनशीलतेच्या विकासाबाबतचा अभ्यास करण्यासाठी मराठी विषयाच्या शिक्षकांच्या अध्यापनाचे व मराठी पाठ्यपुस्तकाद्वारे सर्जनशीलता विकसन बाबतच्या घटकांचे निरीक्षण केले. यासाठी संशोधकाने निरीक्षण तंत्राचा तसेच मराठी विषयाच्या शिक्षकासाठी प्रश्नावली व मुख्याध्यापकांसाठी मुलाखत तंत्राचा वापर केला.*

*सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रम विकसन करण्यासाठी इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील व सर्जनशीलतेतील लवचिकता, मौलिकता, प्रवाहित्व आणि स्पष्टीकरण या घटकासाठी पुरक असणाऱ्या घटकांवर आधारीत एकूण २५ सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन केले.*

*सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी एकल गट अभिकल्पाची निवड केली. विद्यार्थ्यांना पुर्व चाचणी म्हणून डॉ. मल्होत्रा यांची भाषा सर्जनशील चाचणी (LCT) देण्यात आली. त्यानंतर इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील व सर्जनशीलतेतील लवचिकता, मौलिकता, प्रवाहित्व आणि स्पष्टीकरण या घटकासाठी पुरक असणाऱ्या घटकांवर आधारीत एकूण २५ सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रम राबवण्यात आले व उत्तर चाचणी म्हणून डॉ. मल्होत्रा यांची भाषा सर्जनशील चाचणी (LCT) देण्यात आली. पुर्व व उत्तर चाचणीतील प्राप्त गुणांकाच्या आधारे शून्य परिकल्पना संख्याशास्त्रीय तंत्राच्या सहाय्याने पडताळण्यात आल्या.*

**प्रास्ताविक :-**

मानव हा एक बुध्दिमान प्राणी आहे आणि याच बुध्दीच्या बळावर मानवाने मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रामध्ये प्रगती केलेली दिसून येते. बुध्दीच्या वापरातून मानवाने भाषेची निर्मिती केली तसेच आपले विचार, भावना, मत इत्यादी बाबी मांडण्यासाठी अथवा व्यक्त करण्यासाठी भाषेचा विकास घडवून आणला.

शाळेत विविध क्षमतेचे विद्यार्थी असतात. त्या विद्यार्थ्यांना एकत्र करुन त्यांना एकसारख्या प्रकारचे वातावरण पुरवणे व सारख्याच पध्दतीने अध्यापन करणे हे अन्यायकारक ठरते. त्यांच्या विविध क्षमतामधील फरक लक्षात घेवून त्यानूसार वातावरण निर्मिती करुन देणे आवश्यक आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हे शिक्षकांचे कर्तव्य ठरते. तसेच सर्जनशीलतेप्रमाणेच विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाचे ज्ञान कमी जास्त प्रमाणात असतेच यामध्ये बुध्दीचा वापर केला जातो. मराठी विषयातील वेगवेगळे घटक शिकवून झाल्यावर म्हणजेच पाठ, कविता, व्याकरण व निबंधलेखन इत्यादींचा विद्यार्थी किती प्रमाणात संपादणुक करतात व त्याचा किती सर्जनात्मक पध्दतीने नवीन ज्ञान संपादणासाठी वापर करतात हे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील सर्जनशीलता वाढीस लागावी म्हणून सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

**सर्जनशीलतेची व्याख्या :**

**१) ड्रेव्हडल (Drevdhal) १९५६ :**

'कोणत्याही व्यक्तीस पूर्वी पूर्णपणे अज्ञात असलेली व नवीनतम असलेली रचना, कल्पना किंवा उत्पादन निर्माण करण्याची क्षमता म्हणजे त्या व्यक्तीची 'सृजनशीलता' होय.'

**२) स्टॅग्नर आणि कारवोस्की (Stanger & Karvaski) :**

'सर्जनशीलता म्हणजे पूर्णपणे किंवा काही प्रमाणात नवीन तम निर्मिती करणे होय.'

**३) बर्टलेट (Bartlett) १९५८ :**

'सर्जनशीलता ही एक साहसपूर्ण विचारसरणी होय. नेहमीच्या, धोपट किंवा प्रमुख मार्गापासून दूर जाणे. साचेबध्दता मांडणे, नवा अनुभव मुक्तपणे स्विकारणे आणि एका गोष्टींतून दुसरी गोष्ट निर्मितीस परवानगी देणे म्हणजे सर्जनशीलता होय.'

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. इयत्ता ९ वीच्या मराठी विषयाच्या शिक्षकांच्या अध्यापनातून सर्जनशीलतेच्या विकासाबाबतचा अभ्यास करणे.
२. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकाद्वारे सर्जनशीलता विकसन बाबतच्या घटकांचे परीक्षण करणे.
३. सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रम विकसन करण्यासाठी घटक निश्चिती करणे.
४. सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन करणे.
५. सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. इयत्ता ९ वीचे मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक सर्जनशीलता विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे.
२. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम उपयुक्त आहेत.
३. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम राबवताना अडचणी येतात.

**संशोधन प्रश्न व परिकल्पना :-**

**संशोधन परिकल्पना :-**

१. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम उपयुक्त आहेत.
२. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम राबवले असता विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेत वाढ होते.

**शून्य परिकल्पना :-**

१. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम राबवले असता विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेत कोणताही फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-**

१. सदर संशोधनात सोलापूर शहरातील अनुदानित मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांचा विचार केला असून अन्य कोणत्याही माध्यमांच्या शाळांचा विचार केलेला नाही.
२. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीचा विचार केला असून इतर कोणत्याही इयत्तेचा विचार केलेला नाही.
३. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या मराठी विषयाचा विचार केला असून कोणत्याही विषयाचा विचार केलेला नाही.
४. सदर संशोधनात इयत्ता ९ वीच्या मराठी विषयाच्या शिक्षकांच्या अध्यापनातून सर्जनशीलतेच्या विकासाबाबतच्या अभ्यासाचा विचार केलेला असून इतर कोणत्याही विकासाचा किवा संवर्धनाचा विचार केलेला नाही.
५. सदरच्या संशोधनामध्ये सर्जनशीतेच्या लवचिकता, मौलिकता, प्रवाहित्व आणि स्पष्टीकरण या घटकांचा समावेश असून इतर पूर्नमांडणी व समस्या संवेदन क्षमता यांचा विचार केलेला नाही.
६. प्रस्तुत संशोधनात इयत्ता ९ वीच्या मराठी

पाठ्यपुस्तकाद्वारे सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्याचा विचार केलेला असून इतर कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्याचा विचार केलेला नाही.

**संशोधनाचे महत्त्व :-**

पुढील दृष्टीने संशोधन समस्येचे महत्व सांगता येईल.

१. प्रस्तुत संशोधनाचा उपयोग माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकाचे विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धनातील भूमिका जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल.

२. प्रस्तुत संशोधनाचा उपयोग इयत्ता ९ वीच्या मराठी विषयाच्या शिक्षकांच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता विकसनासाठी कोणकोणते प्रयत्न किंवा कार्यक्रम राबवले जातात हे जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

३. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता विकसन करण्यासाठी कोणते कार्यक्रम उपयुक्त आहेत हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

४. सदरच्या संशोधनामुळे सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचा मराठी विषयातील सर्जनशीलतेचा विकास करण्यासाठी किती योगदान असेल हे जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

**संशोधन पध्दतीची निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धती व प्रायोगिक पध्दती या बहु संशोधन पध्दतींची (Multi Research Method) निवडण्यात आली आहे.

**प्रस्तूत संशोधनामध्ये निवडलेला संशोधन अभिकल्प :**

**एकलगट पूर्वोत्तर परीक्षण अभिकल्प**

(One Group Pre test- Post test Design)

प्रस्तूत संशोधनात मराठी विषयातील सर्जनशीलता विकसन कार्यक्रमाची परिणामकारकता पाहावयाची होती त्यासाठी एकाच गटाची आवश्यकता असल्याने एकल गट अभिकल्प निवडला आहे. प्रस्तुत

| | एकूण संख्या N | मध्य मान M | स्वाधीनता मात्रा DF | t मूल्य | शून्य परि कल्पना | संशोधन परि कल्पना |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ६० | ६०.२५ | ५९ | २.०५ | त्याग | स्वीकार |
| उत्तर चाचणी | ६० | ७९.९५ | ५९ | | | |

संशोधनासाठी व पर्थदर्शी अभ्यास करण्यासाठी एकलगट पूर्वोत्तर परीक्षण अभिकल्प निवडण्यात आला. यामध्ये पथदर्शी अभ्यासाच्या स्वरूपात अगदी छोटया गटावर प्रायोगिक पध्दतीने सर्जनशीलता विकसन कार्यक्रम राबविले आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड :**

**सर्वेक्षणासाठी नमुना निवड-**

मराठी विषयातील सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन करण्यासाठी सोलापूर शहरातील ४७.६१ टक्के शाळांची निवड, इयत्ता नववीला मराठी विषय शिकविणाऱ्या १०० टक्के मराठी शिक्षकांची निवड व १०० टक्के मुख्याध्यापकांची निवड करण्यात आली.

**प्रयोगासाठी नमुना निवड-**

मराठी विषयातील सर्जनशीलता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन करण्यासाठी सोलापूर शहरातील जागृती विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला या शाळेची निवड प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने केली. सदर शाळेतील मराठी माध्यमातील इयत्ता ९ वी च्या ६० विद्यार्थ्यांची निवड यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली.

**प्रस्तुत संशोधनासाठी माहिती- संकलनाची साधने**

१. **इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यासाठी -** डॉ. मल्होत्रा यांची सर्जनशीलता शोधिका

२. **इयत्ता ९ वीतील मराठी विषय शिकवणारे शिक्षक-** संशोधक निर्मित प्रश्नावली

३. **शाळेतील मुख्याध्यापकांसाठी -** संशोधक निर्मित मुलाखत

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

**पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांक**

०.०१ सार्थकता स्तरासाठी नमुना t मूल्य = २.६६

०.०५ सार्थकता स्तरासाठी नमुना t मूल्य = २.००

वरील कोष्टकानुसार, पूर्व व उत्तर चाचणी मधील प्राप्तांकांच्या मध्यमानातील फरक १९.७ आहे. उत्तर चाचणी मध्यमान पूर्व चाचणीच्या मध्यमानापेक्षा जास्त आहे. प्राप्त t-मूल्य २०.०५ हे नमुना t-मूल्यापेक्षा जास्त आहे म्हणजेच ते ०.०५ व ०.०१ या दोन्ही सार्थकता स्तरासाठी सार्थ आहे. म्हणून येथे शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

**प्रयोगावरून प्रमुख निष्कर्ष :**

१. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम उपयुक्त आहेत.
२. इयत्ता ९ वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता संवर्धन करण्यासाठी कार्यक्रम राबवले असता विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेत वाढ होते.

**शिक्षक प्रश्नावलीवरून प्रमुख निष्कर्ष :**

१. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार निर्माण होण्यासाठी जिज्ञासा हा घटक महत्वाचा आहे असे ६४ टक्के, संवेदन क्षमता हा घटक महत्वाचा आहे असे ५० टक्के, धोका पत्करण्याची तयारी हा घटक महत्वाचा आहे असे २० टक्के, मनाचा खुलेपणा हा घटक महत्वाचा आहे असे १८ टक्के, स्वयंप्रेरणा हा घटक महत्वाचा आहे असे ५४ टक्के, स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती हा घटक महत्वाचा आहे असे ७२ टक्के शिक्षक म्हणतात.
२. सर्जनशीलतेची संकल्पना समजण्यामध्ये प्रशिक्षण झाले नसल्यामुळे अडचणी येतात असे ४६ टक्के, मुळातच अवघड संकल्पना असल्यामुळे अडचणी येतात असे ५४ टक्के, यापेक्षा वेगळया अडचणी येतात असे २० टक्के शिक्षक म्हणतात.
३. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता निर्माण करण्यासाठी जे उपक्रम घेतले जाते त्यामध्ये विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळतेअसे ६० टक्के, विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता निर्माण करण्यासाठी जे उपक्रम घेतले जाते त्यामध्ये विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळत नाही असे ४० टक्के शिक्षक म्हणतात.

**मुख्याध्यापक मुलाखतीवरून प्रमुख निष्कर्ष :**

१. सर्जनशीलतेची संकल्पना समजण्यामध्ये अडचणी आल्यास शिक्षकांना मार्गदर्शन करून सोडवतो असे ६८ टक्के, तज्ज्ञांचा सल्ला घेऊन सोडवता असे ५० टक्के, इंटरनेट व पुस्तकांच्या माध्यमाने सोडवतो असे ३६ टक्के मुख्याध्यापकांचे मत आहे.
२. सर्जनशीलतेच्या विकासासाठी शाळेत उपक्रम राबवताना येणाऱ्या अडचणी शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सोडवतो असे ७४ टक्के, तज्ज्ञाच्या सल्ल्याने सोडवतो असे २६ टक्के मुख्याध्यापकांचे मत आहे.
३. सर्जनशीलतेच्या विकासासाठी विविध उपक्रम उपयुक्त आहेत असे ६२ टक्के, सर्जनशीलतेच्या विकासासाठी विविध उपक्रम उपयुक्त नाहीत असे ३८ टक्के मुख्याध्यापकांचे मत आहे.
४. सर्जनशीलतेच्या विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमामध्ये शिक्षकांचा सहभाग असतो असे ६८ टक्के, शिक्षकांचा सहभाग नसतो असे ३२ टक्के मुख्याध्यापकांचे मत आहे.

**समारोप:**

शिक्षकांना सर्जनशीलता या संकल्पनेची संपूर्ण ओळख करून घेवून वर्गाध्यापनात त्याचा वापर कसा करावा. शिक्षकांनी सर्जनशीलतेच्या विविध तंत्राचा वापर करून वर्गातील विद्यार्थी आंतरक्रिया, विद्यार्थ्यांचा सहभाग, पुढाकार, वैयक्तिक कृती, प्रश्न विचारणे, कल्पना करणे, बहुदिशेने विचार करणे, शंका निरसन करू न घेणे इत्यादी विद्यार्थी कृतींना वाव घ्यावा.

## संदर्भ ग्रंथ-सूची


1. Hugh Lytton (2012), Creativity and Education, (Volume -46), New York, Routledge taylor and fancies Group.
2. Robert J. Sternberg (1999), Handbook of Creativity, United Kingdom : Cambridge university press.
3. James C. Kaufman (2009), Creativity 101, New York : Springer Publishing company.
4. Agarwal K.P. (1949), Development of vreativity in Indian schools, New Delhi : Concept Publishing company.
5. Newton Lynn (2012), creativity for a New Curriculum 5-11, New York, Routlege taylor and fancies Group.
6. https://www.veraison.com.au
7. https://www.inc.com
8. http://www.entelki.in
9. https://www.teachhub.com/
10. कऱ्हाडे बी. ए. (२००७), शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपूर : पिंपळापूरे अॅण्ड कंपनी पब्लीशर्स.
11. कदम, चा. प.(२००७), शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.
12. कोठारी, सी. आर., (१९९०), रिसर्च मेथडॉलॉजी, न्यू दिल्ली : विले वेस्टर्न.
13. कौल, एल., (१९८८), मेथडॉलॉजी ऑफ एज्युकेशनल रिसर्च, न्यू दिल्ली : विकास पब्लिशिंग हाऊस.
14. सोहनी, चि.(२००८), सर्जनशीलतेचा विकास, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.

१५. तापकीर, द.(२०१०), सर्जनशीलता, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.